एका कल्पक जगाचा विचार

# स्टीव्ह जॉब्झ

प्रशांत पितालिया

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**एका कल्पक जगाचा विचार– स्टीव्ह जॉब्झ**
प्रशांत पितालिया

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
प्रशांत पितालिया
के १/१५, अदित्य नाकोडा इनक्लेव्ह,
सिंहगड रोड, पुणे - ३०
मो. नं. : ९८२२५२५१६६

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

**अर्पण**

कुंभलगड (राजस्थान) निवासिनी
रतलाम (मध्यप्रदेश) स्थित
श्री. वरोठ माता
आणि
जवलिया (राजस्थान)
स्थित
श्री. सती माता

यांचे चरणी...

## स्टीव्ह एक दीपस्तंभ

स्टीव्ह पॉल जॉब्झ (२४ फेब्रुवारी १९५५ – ५ ऑक्टोबर २०११) ला आपण ॲपलचा संस्थापक म्हणून ओळखतो. उत्कृष्ट रचना, कमी किंमत, सौंदर्य आणि वापरातील सुलभता ही त्याच्या उत्पादनाची वैशिष्ट्ये होती, हे आपण जाणतो. संधी कोणालाही न नाकारणाऱ्या अमेरिकेतील तो सर्जनशील उद्योगपती होता. त्याची ओळख सहसंस्थापक, माजी चेअरमन आणि माजी मुख्य कार्यकारी अधिकारी ॲपल इनकार्पोरेशन अशी करून दिली जाते. स्टीव्ह हा पिक्सर ॲनिमेशन स्टुडिओचा सहसंस्थापक आणि पूर्व सी.ई.ओ.देखील होता. अनेक सन्मानविजेत्या ॲनिमेटेड फिल्म्स या स्टुडिओने तयार केल्या. डिस्नेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचाही तो सदस्य होता. पिक्सरच्या उत्कृष्ट कामगिरीसोबतच स्टीव्ह जॉब्झने नेक्स्ट ही कंपनी सुरू केली. तो नेक्स्टचा संस्थापक, चेअरमन व सी.ई.ओ. होता. स्टीव्हला १९७० च्या दरम्यान झालेल्या सूक्ष्म संगणक क्रांतीचा उद्गाता, असेही म्हणण्यात येते. स्टीव्हला कलेचे अंग होते. तो एक अध्यात्मात रुची घेणारा आणि आपल्या कलाकृतीत स्वतःला विसरून जाणारा मनस्वी कलाकार होता. त्याने वैयक्तिक संगणक, संगीत, डिजिटल प्रकाशन, टॅबलेट संगणकीकरण, फोन आणि ॲनिमेटेड चित्रपट या सहा क्षेत्रांवर आपला प्रभाव पाडला. कामातील नियमितता, शिस्त, रचनेवर भर, भव्यतेची ओढ, ग्राहकाला केंद्रस्थानी मानणे यामुळे तो या सर्वच क्षेत्रांत आघाडीवर राहिला.

कॉलेजमध्ये शिकणाऱ्या युवक आणि युवतीला झालेल्या या अपत्याला जन्मतःच सॅन फ्रान्सिस्को येथे दत्तक देण्यात आले. त्याला उत्कृष्ट शिक्षण दिले जावे, एवढी लहान अट त्यासाठी त्याच्या जन्मदात्या आईने घातली होती. तर ऐपत नसतानाही ती अट आपण पूर्ण करू, असे वचन दत्तक घेणाऱ्या पॉल व क्लारा जॉब्झने त्याच्या आईला दिले होते. १९६० च्या आसपास त्याची जडणघडण सॅन फ्रान्सिस्को किनारपट्टीलगत झाली. जॉब्झवर विभिन्न संस्कृतींचा

पगडा इथेच पडला. त्याची जीवनशैली ही त्या दरम्यानच्या जडणघडणीमुळे घडल्याचे आपल्याला लक्षात घ्यायला हवे. प्रेम करणारा, राग व्यक्त करणारा, अध्यात्माच्या ज्ञानासाठी भटकणारा, आईचा शोध घेणारा, मुलीला डी.एन.ए. चाचणीनंतर लाथाडणारा, आपल्या कुटुंबासाठी विमानच मिळावे म्हणून आग्रह धरणारा आणि शाकाहार करणारा स्टीव्ह आपल्याला तिथे कुठेतरी नजरेस पडतो.

कुपरटिनो, कॅलिफोर्निया येथील होमस्टेड हायस्कूलचा विद्यार्थी असणाऱ्या स्टीव्हला, आपल्या वयाहून मोठे असणारे मित्र होते हे ऐकून, वाचून हसूच येते. सहसा एकटा राहणाऱ्या स्टीव्हने अभियांत्रिकीचा वयाने मोठा विद्यार्थी स्टीफन वोजनियाकशी मैत्री केली होती, तर त्याची मैत्रीण क्रिसॲन ब्रेनन ही त्याला ज्युनिअर होती. तिला कलेची आवड होती. १९७२ च्या सुमारास स्टीव्हने रीड महाविद्यालयात शिक्षण घेतले. तिथेही त्याची उपस्थिती जेमतेमच होती. खरे तर आई-वडिलांशी भांडून त्याने या महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. परवडत नसतानाही केवळ दिलेल्या वचनाला जागण्यासाठी त्यांनी स्टीव्हला या महाविद्यालयात प्रवेश घेऊन दिला होता; पण पहिल्याच दिवशी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावरूनच त्यांना परत पाठवत कृतघ्नपणाचा कहर स्टीव्हने केला होता. या महाविद्यालयातूनही त्याला काढून टाकण्यात आले होते. त्यानंतर त्याने ‘कॅलिग्राफी’ शिकली होती आणि कॅलिग्राफीमुळेच आपल्यात सौंदर्यदृष्टी विकसित झाली, आपण सर्वात अगोदर रचनेला महत्त्व देऊ लागलो, असे तो नमूद करतो.

स्टीव्हला आध्यात्मिक रुचीदेखील होती. त्यामुळे अटारीत नोकरी करत असतानाच भारतभ्रमणावर जायचे स्टीव्हने ठरविले. त्याच्या या सफरीसाठी त्याच्या वरिष्ठांनी त्याला मदत केली. जर्मनीतील काम आटोपून त्याला पुढे जाण्यास मुभा मिळाली. त्यामुळे त्याचा खर्चदेखील कमी झाला. भारतात स्टीव्ह जवळपास सात महिने वास्तव्यास होता. यामध्ये त्याला अनेक धर्मांचा अभ्यास करता आला. बुद्ध धर्माचा त्याच्यावर प्रभाव पडला. एका साधूने गर्दीतून फक्त त्यालाच निवडून, त्याचे मुंडण करून आपण असे त्याच्या आरोग्यासाठी करत आहोत, असे सांगितले. या अनुभवाचे गूढ उकलण्यात तो गढून गेला. स्टीव्ह जॉब्झने १९७६ मध्ये वोजनियाकचा ॲपल I संगणक विकण्याकरिता त्याच्यासमवेत ॲपलची स्थापना केली. ॲपल II संगणक जेव्हा बाजारात आला, तेव्हा या द्वयींना नाव, प्रसिद्धी आणि पैसे मिळाले. तोपर्यंत या दोघांच्या खोड्या काही

संपत नव्हत्या. एकमेकांशी मोफत बोलता यावे, यासाठी अवैधरीत्या तयार केलेल्या यंत्राच्या साहाय्यानेही तत्पूर्वी त्यांनी पैसे कमविले होते. ॲपल II हा पहिला सर्वाधिक खपाचा संगणक होता. १९८३ च्या दरम्यान ॲपलच्या पुढच्या संगणकाचे त्याने नामकरण केले. आपल्या लिजा या मुलीचे नाव त्याने या संगणकाला दिले. लिजा ही ब्रेननपासून झालेली मुलगी होती. सुरुवातीला तर तिला मुलगी मानायलाही स्टीव्ह तयार नव्हता. त्यांच्या या उत्पादनाने करिष्मा दाखविला नाही; मात्र १९८४ मध्ये आलेल्या मॅकिंतोशने अनेक उच्चांक गाठले. यामध्ये ग्राफिक्सचा वापर करण्यात आला होता. डेस्कटॉप प्रकाशनात यामुळे क्रांती घडली. 'ॲपल लेझर रायटर' या पहिल्या लेसर प्रिंटरमुळे तर कमालच घडली. जॉन स्कुली या पेप्सीच्या सी.ई.ओ. ला जॉब्झनेच ॲपलमध्ये आणले होते; परंतु त्याला संगणकातील काही कळत नाही, असेच स्टीव्हचे म्हणणे होते. त्या काळात स्टीव्हचे वागणेही बदलले होते. तो लहरी झाला होता. त्याच्यात अहंकार वाढला होता. त्याने इतरांच्या कामात ढवळाढवळ सुरू केली होती. त्याच्या या अशा वागण्याने दोघांच्यात जे युद्ध सुरू झाले होते, त्याचा शेवट मात्र गोड झाला नाही. स्टीव्हला त्याच्याच कंपनीतून हटविण्यात आले. ते वर्ष होते १९८५.

ॲपलमधून बाहेर पडल्यावर स्टीव्हने ॲपलमधीलच काही सहकाऱ्यांना सोबत घेत 'नेक्स्ट' ही कंपनी सुरू केली. उच्च शिक्षण व व्यवसायाकरिता वापर करता यावा यासाठी उच्च दर्जाचा, अधिक क्षमता असणारा संगणक प्लॅटफॉर्म विकसित करणारी ही कंपनी होती. जॉब्झने दृश्य परिणाम उद्योगातही आपले पाय रोवले. जॉब्झने जॉर्ज लूकास कंपनीच्या 'लूकासफिल्म' या विभागाला अर्थसाहाय्य केले. याचे नामकरण नंतर पिक्सर असे करण्यात आले. 'टॉय स्टोरी' या पहिल्या ॲनिमेटेड फिल्मने अनेक सन्मान जिंकले. यानंतर आलेल्या चारही फिल्मस्‌ना अनेक सन्मान मिळाले. डिस्नेशी साहाय्य कराराने बांधल्या गेलेल्या या कंपनीला स्टीव्हने मोठ्या खुशीने डिस्नेलाच विकले. स्टीव्ह जॉब्झला या क्षेत्रात मिळालेले यश अभूतपूर्व होते.

स्टीव्ह जॉब्झने १९९७ च्या सुरुवातीस आपण सुरू केलेली नेक्स्ट कंपनी ४२७ मिलियन डॉलरला ॲपलला विकली. स्टीव्हने i CEO हे नवे पद तयार केले आणि तो ॲपलमध्ये रुजू झाला. त्याचे पुनरागमन ॲपलला नवचेतना देणारे ठरले. अत्यंत दयनीय अवस्थेला आलेल्या ॲपलला स्टीव्हने सावरले. हळूहळू

त्याच्या पदातील 'i' मागे पडले आणि तो सी.ई.ओ. झाला. एका दिवाळखोरीला आलेल्या कंपनीला स्टीव्हच्या दूरदृष्टीने, उत्पादनातील विविध टप्पे कमी करण्याने, एकाग्र होऊन काम करण्याने, वेडेपणा करा या मार्गदर्शनाने आणि एकजुटीच्या भावनेने पुन्हा नफ्यात आणून ठेवले. जोनाथन इन या रचनाकाराच्या मदतीने, टीम कुक या इन्वेन्ट्री व्यवस्थापकाच्या सर्वोत्कृष्ट कामगिरीने स्टीव्हने ॲपलच्या सर्वोत्कृष्ट उत्पादनांची अक्षरशः रांग लावली. iMac, iTune, Apple Store, iPod, iTunestore, iPhone, App store, iPad, Mac OS, OSX या उत्पादनांनी बाजारात एक चेतना आणली. नावीन्य आणले. प्रचंड मागणी वाढविली. इतकेच नव्हे, तर वैयक्तिक जीवनात आपली दिनचर्या सुधारावी, सुसंस्कृत दिसावी याकरिता जीवनशैलीत ॲपलला अग्रक्रम दिला.

२००३ च्या सुमारास स्टीव्ह जॉब्झला स्वादुपिंडाच्या अंत:स्रवी ग्रंथीची गाठ झाल्याचे निष्पन्न झाले. थोडक्यात कॅन्सर झाल्याचे नक्की झाले. त्याचा आजार अनेक प्रभावी उपचाराअंती बळावतच गेला. आपल्या ॲपलला लिहिलेल्या अखेरच्या पत्रात स्टीव्ह लिहितो, 'मी नेहमी म्हणत आल्याप्रमाणे जर कधी असा दिवस उगवला की, मी माझी कर्तव्ये पार पाडू शकत नाही आणि ॲपलचा सी.ई.ओ. म्हणून आपल्या अपेक्षा पूर्ण करू शकत नाही, तर सर्वांत प्रथम मी आपणास सांगेन. दुर्दैवाने तो दिवस उगवला आहे.' त्या पत्राने तो चेअरमनपदी कायम राहिला, तर सी.ई.ओ. पदाचा राजीनामा दिला. त्याच्या ठिकाणी टीम कुकला नियुक्त करण्यास यावे असे स्पष्ट आदेश त्याने दिले. मृत्यूपूर्व सहा आठवडे तो ॲपलसाठी काम करतच राहिला. श्वासाचा त्रास सुरू झाल्याने अखेर स्टीव्ह जॉब्झने देह सोडला. अगदी अखेरच्या दिवसातही काचेचा डेक असणाऱ्या जहाजाच्या कल्पनेत स्टीव्ह रमला होता आणि अगदी प्राण सोडतानाही सौंदर्य उपासक, सामान्य माणसाला संगणक उपलब्ध करून देणाऱ्या, स्वप्नात रममाण होणाऱ्या आणि अद्भुत कल्पनांना प्रत्यक्षात उतरविणाऱ्या या जादूगाराचे शेवटचे शब्द होते.

'OH WOW, OH WOW, OH WOW!'

**– प्रशांत पितालिया**

✦✦✦

# *अनुक्रमणिका*

| | | |
|---|---|---|
| १. | स्टीव्हचा जन्म आणि बालपण................................ | ११ |
| २. | शिक्षण लहानपणीचे.......................................... | १८ |
| ३. | स्टीफन वोजनियाक........................................... | २९ |
| ४. | स्टीव्हच्या मैत्रिणी आणि मुलगी लिजा....................... | ३५ |
| ५. | रीड महाविद्यालय आणि कॅलिग्राफी........................... | ४२ |
| ६. | अटारी नोकरी................................................ | ४७ |
| ७. | भारतदर्शन................................................... | ५० |
| ८. | ॲपल स्थापना आणि प्रगती.................................. | ५६ |
| ९. | जॉन स्कूली आणि स्टीव्ह जॉब्झ यांच्यातील द्वंद्व............ | ७४ |
| १०. | नेक्स्ट आणि पिक्सर.......................................... | ८७ |
| ११. | ॲपलमधील पुनरागमन....................................... | ९८ |
| १२. | स्टीव्ह व जोनाथन इव्ह आणि ॲपल स्टोअर................ | ११२ |
| १३. | दोन हात कॅन्सरशी........................................... | १२० |
| १४. | स्टीव्ह जॉब्झचे कुटुंब......................................... | १३३ |
| १५. | शोध जन्मदात्या आईचा..................................... | १३४ |
| १६. | स्टीव्ह, लॉरेन आणि मुले.................................... | १४१ |
| १७. | आभाळाहून मोठी दुःखे....................................... | १५४ |
| १८. | अवलियाची स्वप्ने............................................ | १५९ |
| १९. | अकल्पित कर्तृत्व............................................. | १६७ |
| २०. | थोरा-मोठ्यांनी वाहिलेली श्रध्दांजली.......................... | १७० |
| २१. | विचारधन..................................................... | १७३ |
| २२. | जीवनवृत्तांत................................................... | १९२ |
| २३. | गुणांची खाण.................................................. | २०५ |

✦✦✦